# प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजना

## नोंदणीची कार्यपध्दती

1. योजनेमध्ये असंघटीत क्षेत्रामध्ये काम करणारा वय वर्ष 18 ते 40 दरम्यानचा कामगार,
2. मासिक उत्पन्न 15000/- रु. पेक्षा कमी असणारा व कर्मचारी राज्य बिमा निगम, भविष्य
3. निर्वाह निधी अथवा राष्ट्रीय पेन्शन योजनेचा सभासद नसणारा कामगार पात्र आहेत.
4. 18 ते 40 वयोगटातील लाभार्थीने रु.55 ते 200/- पर्यंत प्रतिमाह अंशदान जमा केल्यानंतर लाभार्थीस वयाची 60 वर्ष पुर्ण केल्यानंतर दरमहा 3000/- रुपये निवृत्तीवेतन देय राहिल.
5. योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी लाभार्थीस नजिकच्या नागरी सुविधा केंद्रास (Common Service Centres) भेट दयावी लागेल.
6. लाभार्थीस नागरी सुविधा केंद्रामध्ये गेल्यानंतर योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी खालील कागदपत्रे उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

   क) आधार कार्ड

   ख) बँक पासबुक (राष्ट्रीयकृत बँक अथवा IFSC कोड असलेली इतर कोणतीही बँक)

   ग) भ्रमणध्वनी ( OTP करीता स्वत:चा अथवा कुटुंबातील अन्य व्यक्तीचा )

   घ) पहिला मासिक अंशदान (वयानुसार, रोख स्वरूपाने)
7. नागरी सुविधा केंद्रामार्फत बँक खात्याचा तपशील, ई-मेल आयडी, वारसदार (पती/पत्नी) व भ्रमणध्वणी क्रमांक याबाबतचा तपशील अद्यावत केला जाईल.
8. लाभार्थी कामगारास त्याच्या वयानुसार पहिल्या मासिक अंशदानाची रक्कम रोखीने अदा करावी लागेल. त्याबाबतची रक्कम भरणा केल्याची पावती संबंधीत नागरी सुविधा केंद्राकडून लाभार्थीस देण्यात येईल.

9. लाभार्थींच्या वयानुसार अंशदानांची रकमेची गणना सिस्टीमद्वारे ऑनलाईन करण्यात येईल. योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी पात्र लाभार्थी कामगारास त्याच्या वयानुसार पहिल्या मासिक अंशदानाची रक्कम रोखीने अदा करावी लागेल (तक्ता सोबत जोडला आहे ).

10. दुसऱ्या मासिक अंशदानापासून लाभार्थीचे अंशदानाची रक्कम लाभार्थीचे बँक खात्यातुन परस्पर कपात करण्यात येईल.

11. लाभार्थीने योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी योजनेच्या अटी व शर्ती मान्य असल्याबाबत स्वाक्षरी केलेले स्वंयघोषणा पत्र व छापील सहमती पत्र, स्कॅन करण्यात येऊन सिस्टीमवर अपलोड करण्यात येईल.

12. पहिला मासिक अंशदान जमा केल्यानंतर प्रधान मंत्री श्रम योगी योजनेंतर्गत LIC द्वारे पेन्शन खाता क्रमांक जारी करण्यात येईल.

13. नोंदणीची प्रकिया पुर्ण झाल्यानंतर लाभार्थीस श्रम योगी कार्ड व स्वाक्षरी केलेले स्वंयघोषणा पत्र देण्यात येईल.

14. श्रम योगी मानधन योजना खाते सुरू झाल्यानंतर लाभार्थीस लाभार्थीचे बँक खात्यातुन परस्पर कपात केलेल्या अंशदानाची माहीती एसएमएस द्वारे देण्यात येईल.

15. योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी लाभार्थीस इतर कोणतेही शुल्क नागरी सुविधा केंद्रास अदा करावे लागणार नाही. त्याबाबतचे शुल्क नागरी सुविधा केंद्रास केंद्र शासनाकडून परस्पर अदा करण्यात येईल.